MADC

महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत उपक्रम)
दूरध्वनीः ०२२–४९२१ २१२१ • फॅक्सः ०२२-२२१६ ३८१४
CIN : U45203MH2002SGC136979

**म.वि.वि.कं.२०२५/प्र.क्र.११/प्रशा/ ९४५५** **दिनांक: १५ डिसेंबर, २०२५**

# <u>कार्यालयीन नोटीस</u>

**विषय:** महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्या., मुंबई मुख्यालयातील कुरियर सर्व्हिस सेवा उपलब्ध करुन देणाऱ्या पुरवठादारांकडून दरपत्रके सादर करणेबाबत.

महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्या., मुंबई मुख्यालयातील कार्यालयासाठी आवश्यक असणाऱ्या कुरियर सर्व्हिस कामासाठी खालील अटी शर्तीस अधिन राहून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

- **अटी व शर्ती:**

१. सेवा पुरविण्यासाठीचा दर (जीएसटी) दरासह सादर करावा (एकत्रित दर).
२. कामकाज कालावधी एक वर्ष (दिनांक ०१.०१.२०२६ ते ३१.१२.२०२६) कालावधीचा असेल.
३. कुरियर घेवून जाण्या - येण्यासाठीचे शुल्क त्या ठिकाण्याच्या अंतरावर (कि.मी.) अवलंबून असावे.
४. स्थानिक, राज्यांतर्गत व देशांतर्गत कुरिअरसाठी दर सादर करावे.
५. कुरियर च्या वजनानुसार दरांचा तपशिल, उदा.
   - ० ते २५० ग्रॅम
   - २५१ ते ५०० ग्रॅम
   - ५०१ ग्रॅम ते १ किलो
   - १ ते २ किलो
   - प्रत्येक अतिरिक्त किलोसाठी दर
६. कुरियर डिलिव्हरीसाठी लागणारा कालावधी
७. कुरियच्या वजनाप्रमाणे त्याचे दर व अति महत्वाच्या कागद-पत्रांची पाठविणी करावयाची असल्यास त्यासाठी लागणारे दर सादर करावे.
८. प्रतिमहिना कुरिअर बिलासोबत ज्या-ज्या ठिकाणी कुरिअर डिलिव्हरी करण्यात आलेली आहे त्या सर्व ठिकाणांची सविस्तर यादी जोडावी.

❖ **सदर यादीमध्ये खालील तपशील असणे आवश्यक आहे.**
   - पाठविण्यात आलेल्या ठिकाणाचे नाव (शहर/गाव)
   - पूर्ण पत्ता
   - वजन (ग्रॅम/किलो)
   - कुरिअरचा प्रकार (कागदपत्रे/इतर साहित्य)
   - पाठविण्याची तारीख
   - डिलिव्हरीची तारीख

- प्रत्येक डिलिव्हरीसाठी आकारलेला दर

९. मागविण्यात आलेले दरपत्रक कोणतेही कारण न देता, रद्द करण्याचा अधिकार महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्या., मुंबई यांना आहे.

वरील अटी शर्तींची पूर्तता करुन पुरवठादारांनी आपले दरपत्रक दिनांक जीएसटी सहीत **दिनांक १५.१२.२०२५ ते २२.१२.२०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यंत या कार्यालयास सादर करण्यात यावे.**

Patil
१५।१२।२५

**सल्लागार (प्रशासन)**